# सह दिवाणी न्यायाधिश ‘क’ स्तर, जामखेड जि.अ.नगर यांचे न्यायालयात

नि. दि. दावा क्र. ३२६/२०१४ **नि.क्र.**

नामदेव मोहोळकर व ईतर विरुद्ध नामदेव घाटुळे व ईतर

**दावा :** खरेदीखत रद्दबातल ठरवून जाहीर होवुन मिळणेसाठी, वाटपासाठी व निंतर मनाई हुकूम मिळणेसाठी..

## मुद्दे (एल)

**१.** वादी असे सिध्द करतात काय की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जीत मिळकती आहेत ?

**२.** वादी असे सिध्द करतात काय की, प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी दिनांक २१.०७.१९८९ रोजी करुन घेतलेले दावा मिळकतींपैकी गट क्र. ५०९ चे खरेदीखत दस्त क्र. ९२०/१९८९ हे वादी क्र. १ ते ६ यांच्या उपरोक्ष बिगर कब्जाचे व पोकळस्त करुन घेतलेले असुन ते वादी क्र. १ ते ९ यांच्या दावा मिळकतीमध्ये असलेल्या हिश्यांवर बंधनकारक नाही ?

**३.** वादी असे सिध्द करतात काय की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी क्र. १ ते ३ आणि वादी क्र. ७ व ८ यांचे वडिल लक्ष्मण तसेच वादी क्र. ९ व १० यांच्याकडून दिनांक १६.०९.१९९८ रोजी करुन घेतलेली खरेदीखत क्र. १२१८/१९९८ व १२१९/१९९८ ही बेकायदेशीर, पोकळस्त व बिगर कब्जाची आहेत ?

**४.** प्रतिवादी क्र. १ ते ८, १०, १२ ते १४ व २१ असे सिद्ध करतात काय की, वरील नमुद दिनांक १६.०९.१९९८ रोजीची दोन्ही खरेदीखते आणि दिनांक २१.०७.१९८९ रोजीच्या खरेदीखतान्वये त्यांनी दावा मिळकती या रितसर मोबदला देवुन विकत घेतलेल्या असुन त्याद्वारे ते दावा मिळकतींचे कायदेशीर मालक व कब्जेवहिवाटदार झालेले आहेत ?

५. वादी असे सिद्ध करतात काय की, प्रतिवादी क्र. १ ते १४ हे वादींच्या असणा-या दावा मिळकतींवरील असलेल्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत ?

६. वादींच्या दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते काय ?

७. वादींच्या दाव्यास आवश्यक पक्षकार व आवश्यक मिळकती समाविष्ट न केल्याची बाधा येते काय ?

८. वादी मागणीप्रमाणे दिनांक २१.०७.१९८९ रोजीचे वरील नमुद खरेदीखत त्यांच्या हिश्यावर बंधनकारक नाही आणि दिनांक १६.०९.१९९८ रोजीची वरील नमुद दोन्ही खरेदीखते बेकायदेशीर, पोकळस्त व बिगर कब्जाची आहेत, असे घोषीत होवुन मिळण्यास पात्र आहेत काय ?

९. वादी मागणीप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप होवून मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास त्यांचा प्रत्येकी हिस्सा किती ?

१०. वादी मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कामध्ये निरंतर मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत काय ?

११. प्रतिवादी क्र. १ ते ८, १०, १२ ते १४ व २१ हे नुकसान भरपाई म्हणून वादींकडून रक्कम रूपये ५०,०००/- मिळण्यास पात्र आहेत काय ?

१२. आदेश व हुकूमनामा काय ?

RAJNIKANT SHESHERAO JAGTAP

Digitally signed by RAJNIKANT SHESHERAO JAGTAP
Date: 2024.03.30 18:50:44 +0530

( रजनिकांत शे. जगताप )
सह दिवाणी न्यायधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांकः ३०/०३/२०२४